सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन, गृह विभाग
महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा

दूरध्वनी क्रमांक ०२०/२६१२४८१५
फॅक्स नंबर-०२०/२६१२५८७८.
Email- igoffice.industry-mh@gov.in
Website- www.mahaprisons.gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
यांचे कार्यालय, मध्यवर्ती इमारत,
२ रा मजला, पुणे-४११ ००१

जा.क्र.कारागृह उद्योग/ सुधारीत बंदी मेहनताना / ४७२५ /२०२३/कक्ष-१० दिनांक १४.०८.२०२३

परिपत्रक

**विषय:- राज्यातील कारागृहातील बंद्यांना सुधारीत दराने मेहनताना निश्चित करणेबाबत.**

संदर्भ:- १. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक जेएलई-१०१३/७२६/प्र.क्र.१८५/तुरुंग-१, दि. २०/०८/२०१४.

२. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक जा.क्र.कारखाना/बंदी वेतन/६६६८/२०१७/कक्ष-१०, दिनांक ०२/०८/२०१७.

३. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक जा.क्र.कारागृह उद्योग/सुधारीत बंदी मेहनताना/३९८७ /२०२०/कक्ष-१०, दिनांक १९/०८/२०२०.

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये बंद्यांच्या मेहनतान्यामध्ये वाढ करण्यात आली असुन बंदी मेहनतान्यामध्ये दर तीन वर्षांनी १० टक्के वाढ करणेबाबत शासन निर्णयामध्ये तरतूद आहे. यास्तव शासन निर्णयानुसार बंदी मेहनताना वाढ करणे क्रमप्राप्त असल्याने सुधारीत बंदी मेहनताना खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. **सदर सुधारीत बंदी मेहनताना दिनांक २०.०८.२०२३ पासून लागू होईल.**

| अ क्र | बंद्यांची वर्गवारी | बंद व खुले कारागृहातील बंद्यांसाठी मेहनताना प्रति दिवस/प्रति टास्क | | खुल्या वसाहतीतील बंद्यांसाठी मेहनताना प्रति दिवस/प्रति टास्क | |
|---|---|---|---|---|---|
| | | सध्याचे दर | सुधारीत दर | सध्याचे दर | सुधारीत दर |
| १ | कुशल | रु. ६७.०० | **रु. ७४.००** | रु. ८५.०० | **रु. ९४.००** |
| २ | अर्धकुशल | रु. ६१.०० | **रु. ६७.००** | -- | -- |
| ३ | अकुशल | रु. ४८.०० | **रु. ५३.००** | -- | -- |

बंद्यांच्या मेहनतान्याचा होणारा खर्च १) मागणी क्रमांक बी-५, २०५६, १०१, तुरुंग (००) (००) (०१) मध्यवर्ती तुरुंग (दत्तमत) (२०५६००३५) ०२,मजुरी,२) मागणी क्रमांक बी-५, २०५६, १०१, तुरुंग (००) (०२) जिल्हा तुरुंग (दत्तमत) (२०५६००४४) ०२, मजुरी या लेखाशिर्षांतर्गत त्या वित्तीय वर्षातील मंजुर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

(अमिताभ गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

प्रति,

अधीक्षक, मध्यवर्ती/जिल्हा/खुले (सर्व)/विशेष कारागृह/खुली वसाहत

प्रत - मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (अ.व.सु.)(तुरुंग) महाराष्ट्र शासन, दुसरा मजला, मंत्रालय,मुंबई-३२ यांना शासन निर्णयानुसार सदर वाढ महाराष्ट्र विधनमंडळाच्या नजरेस आणून देणेकरिता सविनय सादर.

**प्रत:- माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी**

१. प्रादेशिक विभाग प्रमुख (सर्व)

२. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)/उपकोषागार अधिकारी पैठण, जि. औरंगाबाद/मोर्शी जि. अमरावती

३. कक्ष अधिकारी (सर्व), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१